## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २३९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०५/२०१८

**१ )टिप्परच्या धडकेत दोन जखमी:--**

दिनांक ०७/०५/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन यातील मोटार सायकल क्र. एम एच ३१ ईटी ७००४ चे मोटार साकलला धडक देवुन चालक विजय गजभीये व त्याचे मागे बसलेला इसम सुरज दहिवले याचा अपघात करून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पडुन गेल्याने फिर्यादी नाशिक दत्रक मेश्राम वय ४० वर्ष रा. बाम्हणी यांचे तोंडी व एमएलसी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७,४२७ भादवी. सहकलम १८४,१३४/ १८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) ट्रॅक्टरची चोरी :--**

दिनांक ०६/०५/२०१८ चे ०६.०० ते ०७/०५/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी उमाशंकर खुशाल गायधने वय ३० वर्ष रा. गांधीवार्ड देव्हाडी हा दि. ०६/०५/२०१८ चे ०६.०० वाजता ते दि. ०७/०५/२०१८ चे १४.०० वाजता पर्यत मित्राचे लग्नाला मुल जि. चंद्रपुर येथे गेला असता फिर्यादीने त्याचे घरासमोरील अंगणात ट्रॅक्टर क्र. एमएच ३६/७९८१ ट्रॉलीसह कि. १,५०,०००/रु. चा ठेवला असता कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाडे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) शेतातील तनसीचा ढिग व मोटारीला लावलेला सेक्सन पाईप जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :--**

दिनांक ०७/०५/२०१८ चे १३.०० वाजता ते १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी याने त्याचे शेतातील धुरे बेदरकारपणे व हयगयीने जाळुन फिर्यादीचे शेतामध्ये धुऱ्यावर असलेल्या तनसीच्या ढिगाला व लाकडी खोडाला तसेच मोटारीला लावलेला सेक्शन पाईप जाळुन अंदाजे ८,०००/रु. चे नुकसान केले आहे. तसेच या बाबद आरोपीला हटकले असता, आरोपीने तुझ्याने जे बनते ते कर असी धमकी दिल्याने फिर्यादी प्रेमदास कबल पडोळे वय ६५ वर्ष रा. आजीमाबाद यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८५,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुसावळे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) विदयुतची चोरी केल्याने गुन्हा नोंद:--**

सन २०१६ ते दि. २४/०४/२०१८ पर्यत यातील फिर्यादी यांनी सहकाऱ्यासह यातील आरोपीचे घरी विदयुत चोरी बाबत रेड घातली असता मिटर क्र. २०७७९२३ ROLEX कंपनीचे मिटर वरील पुश बटन काढुन मिटच्या आतील PCB क्रॅसेस करून मिटर हॅन्ग करून २०९३ युनिट वापरून ३१,६००/रु. ची विज चोरी केल्याचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १३५ भरतीय विदयुत कायदा २००३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) शेत शिवरातील मोटार पंपची चोरी :--**

दि. २/०५/२०१८ चे १९.०० ते ०३/०५/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीने सोंडया शेत शिवारातील शेतातील ऊसाला पाणी देण्यासाठी विहीरीला लावलेली सि.आर.आय. मोनो ब्लॉक २ एचपी कंपनीची मोटार पंप कि. ११,३००/रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी तुकाराम धर्मा लांजे वय ७० वर्ष रा. सोंडया यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**६) अवैधरीत्या डिझेल विक्री करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :--**

दि. ०८/०५/२०१८ चे ०६.०० ते ०७.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने संजीवीनी धाब्याचे मागील खोलीत १ मोठया पिवळया रंगाचा प्लास्टीक कॅन मध्ये ५० लिटर डिझेल कि. ३,४५०/रु. दुस--या पिवळया रंगाचा प्लास्टीक कॅन मध्ये २५ लिटर डिझेल कि. १,७२५/रु, तिस--या पिवळया रंगाचा प्लास्टीक कॅन मध्ये ३० लिटर डिझेल कि. २,७००/रु., १ दुधाची कथ्या रंगाची कॅन ज्यात ४० लिटर डिझेल कि. २,७६०/रु., सिमेंट रगांची प्लास्टीक कॅन ज्यात ६० लिटर डिझेल कि. ४,१४०/रु., निळया रंगाची प्लास्टीक कॅन ज्यात २७ लिटर डिझेल कि. १,८६३/रु. १ पाच लिटरचे लोखंडी माप कि. २००/रु. १ लिटर लोखंडी माप कि. १००/रु., पांढ--या रंगाची प्लास्टीक चाडी कि. ५०/रु., १ दुसरी हाताने बनवलेली प्लास्टीक चाडी कि. ५०/रु., १ प्लास्टीक ४ फुट पाईप कि. १०/रु., असा एकुण १९,१७८/रु. चा माल डिझेल विक्री करीता अवैधरीत्या बाळगुन मिळुन आल्याने पंचा समक्ष जप्त करून तसेच सरतर्फे फिर्यादी पोनी. चकाटे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पिवनी येथे कलम ३,७ जिवनावश्यक वस्तु अधीनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. चकाटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**७) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :--**

**अ**) दिनांक ०८/०५/२०१८ चे १८.३० वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही दारू पिवुन दारूचे नशेत टोल नाका कारधा येथे चालवितांनी मिळुन आल्याने, त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. तिवारी वानिशा. यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सफौ. नान्हे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**ब**) दिनांक ०८/०५/२०१८ चे १८.५५ वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही दारू पिवुन दारूचे नशेत खरबी एनएच ०६ रोड येथे चालवितांनी मिळुन आल्याने, त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. हाके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोशी. राठोड पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**८) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :--**

दिनांक ०८/०५/२०१८ चे १८.४० वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही दारू पिवुन दारूचे नशेत मिसील टॅक राजीव गांधी चौक येथे चालवितांनी मिळुन आल्याने, त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. मेश्राम वानिशा. यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पो.ना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**९) आमरोड वर येणा--या जाणा--या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :--**

**अ**) दिनांक ०८/०५/२०१८ चे २०.०५ ते २०.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बोलेरो वाहन हि भिलेवाडा करचखेडा फाटा येथे सार्वजनीक ठिकाणी उभा करुन रहदारीस अडथळा निर्माण करतांनी मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. खैरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खैरे पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

**ब**) दिनांक ०८/०५/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा सुमो वाहन हि कारधा येथे सार्वजनीक ठिकाणी उभा करुन रहदारीस अडथळा निर्माण करतांनी मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. मनगटे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

**१०) अवैध हातभट्टी व देशी /जुगार दारु अडड्यांवर धाडी . :--**

दिनांक ०८/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर सिहोरा,भंडारा, व साकोली येथे अवैध हातभट्टी व देशी/जुगार दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २४५ लिटर हातभंट्टी दारू +१४३० किलो सडवा मोहा + साहीत्य किमती १,०२,५६०/--रु. व ०१ लिटर ६२० मिली देशी दारु किंमती ९८८/रु. तसेच जुगारातुन कि. ७८०/रु. असा एकुण किंमती १,०४,३२८/--रु. चा माल जप्त करण्यात आला.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :--**

दिनांक ०८/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक-- ११ तीन सिटर वाहनाकरीता-- ०८ ईतर वाहनांवरती -- १०४ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिति कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत,** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.